RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक ३३] मंगळवार, मे १४, २०१३/वैशाख २४, शके १९३५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ७५

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ मे २०१३.

### आदेश

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २०१३/अनौ.सं.क्र. १९/ प्र. क्र. २३५/म-१.— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा अधिनियम क्र. ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या बाबतीत काढलेले सर्व आधीचे आदेश, अधिसूचना किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याची खात्री पटत असल्याने यद्वारे, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. पीएसआय-२०१३/(सीआर-५४) उद्योग-८, दिनांक १ एप्रिल २०१३ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या ' सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत ' खालील अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे युनिटांच्या/प्रकल्पांच्या पहिल्या संलेखांवर आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क दिनांक १ एप्रिल २०१३ रोजी सुरू होणाऱ्या व दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी (दोन्ही दिवस धरून) खालील शर्तीवर माफ करण्यात येत आहे.

**शर्ती.**— (१) ज्या कामासाठी माफी देण्यात आली आहे ती कामे संलेखाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीच्या आत सुरू करण्यास कसूर करणारे किंवा सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत कोणत्याही शर्तीचा भंग करणारे कोणतेही युनिट जणू काही सुरुवातीपासूनच माफी देण्यात आली नसल्याप्रमाणे मुद्रांक शुल्क व दंड भरण्यास पात्र ठरेल.

(२) ज्या कोणत्या युनिटांनी उक्त योजने अंतर्गत मुद्रांक शुल्क माफी/सवलतींचा लाभ घेतला असल्यास, ती युनिटे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा योजना २००९ अंतर्गत कोणतेही आदेश किंवा नियम किंवा अन्य कोणत्याही योजने अंतर्गत लाभ घेण्यास पात्र ठरणार नाहीत.

**स्पष्टीकरण.**—(१) या आदेशाच्या प्रयोजनासाठी युनिट याचा अर्थ, ' सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ ' अंतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या अंमलबजावणी अभिकरणाने किंवा या बाबतीत त्यांनी प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यांनी असे युनिट म्हणून प्रमाणित केले असेल असे युनिट असा आहे.

(२) ' सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ ' अंतर्गत पात्र, नवीन युनिट/विस्तार युनिट, ही या आदेशाच्या प्रयोजनासाठी त्यांच्या गुंतवणूक कालावधीमध्ये मुद्रांक शुल्कातून सवलतीस पात्र असतील.

## अनुसूची

| अ.क्र. | युनिटाचा प्रकार आणि क्षेत्र | अनुज्ञेय सवलत | संलेखाचे प्रकार व अधिनियमातील अनुसूची-१ मधील अनुच्छेद |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | नवीन युनिट/विद्यमान युनिटांचा विस्तार/ विकेंद्रीकरण (गुंतवणुकीच्या कालावधीकरिता, मेगा, अल्ट्रामेगा प्रकल्प यांच्या समावेशासह) गट 'क' 'ड' आणि 'ड+' वर्गीकृत केलेले तालुके, 'ना उद्योग जिल्हे' आणि नक्षलवाद प्रभावी क्षेत्र. | १००% | तारण गहाण व हक्क निक्षेप ठेव संलेख (अनुच्छेद ६), अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५), गहाण मालमत्तेवर अधिक भार लादणारा संलेख (अनुच्छेद ३३), भाडेपट्टा (अनुच्छेद ३६), आणि गहाण विलेख (अनुच्छेद ४०). |
| २. | अ आणि ब वर्गीकृत क्षेत्रामध्ये सार्वजनिक पार्कातील जैविक तंत्रज्ञान उत्पादन युनिटे आणि माहिती तंत्रज्ञान उत्पादन युनिटे. | १००% | तारण गहाण व हक्क निक्षेप ठेव संलेख (अनुच्छेद ६), अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५), गहाण मालमत्तेवर अधिक भार लादणारा संलेख (अनुच्छेद ३३), भाडेपट्टा (अनुच्छेद ३६), आणि गहाण विलेख (अनुच्छेद ४०). |
| ३. | अ आणि ब वर्गीकृत क्षेत्रामध्ये खाजगी पार्कातील जैविक तंत्रज्ञान उत्पादन युनिटे आणि माहिती तंत्रज्ञान उत्पादन युनिटे. | ७५% | तारण गहाण व हक्क निक्षेप ठेव संलेख (अनुच्छेद ६), अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५), गहाण मालमत्तेवर अधिक भार लादणारा संलेख (अनुच्छेद ३३), भाडेपट्टा (अनुच्छेद ३६), आणि गहाण विलेख (अनुच्छेद ४०). |
| ४. | अ आणि ब वर्गीकृत क्षेत्रामधील मेगा प्रकल्प | ५०% | अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५). |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज्योत्स्ना मु. माडेकर,**
कक्ष अधिकारी.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400032,
Dated the 14th May 2013

*ORDER*

MAHARASHTRA STAMP ACT, 1958.

No.Mudrank-2013/UOR-No.19/CR-235/M-1.- In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (Act No. LX of 1958) (hereinafter refered to as 'the said act') and in supersion of all previous orders, notification or instruments issued in this behalf, the Government of Maharashtra being satisfied that it is necessary so to do in the public intrest hereby remits the stamp duty chargeable on the first instrument of the units/projects mentioned in column 4 of the schedule appended hereto, of Schedule-I appended to the said Act, as per Package Scheme of Incentives, 2013 approved under the Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. PSI-2013/(CR-54)/IND-8, dated 1st April 2013, particularly described in the schedule appended hereto, for the period starting from the 1st April 2013 and ending on 31st March 2018 (Inclusive of both days) subject to following condition namely :-

*Condition*.- (*i*) Any unit failing to start the activities within the period of three years from the date of instrument for which the remission in the stamp duty is granted or commits breach of any of the conditions of the package schemes of incentives-2013 shall be liable to pay the whole the stamp duty and penalty, if any, as if there was no reduction in stamp duty from the beginning.

(*ii*) The unit which availed the remission under this order shall not be, entitled for remission of the stamp duty as per reduction or remission granted by any order or rule issued as per Maharashtra IT/ITES Policy, 2009 or any other policy.

*Explanation*.- (*1*) For the purpose of this order, unit means, a unit which is so certified by the Implementing Agency specified under the package schemes of incentives-2013 or any other officer authorised in this behalf.

(*2*) Eligible New/Expansion Units of PSI-2007 will also be eligible for Stamp Duty Exemption during their investment period.

*Schedule*

| Sr. No. (1) | Type of Units and Zone (2) | Extent of Remission (3) | The Type of Instruments under Article of the Schedule I of the Act (4) |
|---|---|---|---|
| 1. | New Units/Units undertaking expansion/Diversification (including Mega and Ultra Mega Projects during the investment period) in Group C, D, D+ Talukas, No Industry Districts and Naxalism affected areas. | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article 6), Conveyance (Article 25), Further charge on Mortagaged property (Article 33), Lease (Article 36), and Mortgaged Deed (Article 40). |
| 2. | BT Manufacturing Units and IT Manufacturing Units in Public Parks in group A and B areas. | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article 6), Conveyance (Article 25), Further charge on Mortagaged property (Article 33), Lease (Article 36), and Mortgaged Deed (Article 40). |

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| 3. | BT Manufacturing Units and IT Manufacturing Units in Private Parks in group A and B areas. | 75% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article 6), Conveyance (Article 25), Further charge on Mortagaged property (Article 33), Lease (Article 36), and Mortgaged Deed (Article 40). |
| 4. | Mega Projects in group A and B areas. | 50% | Conveyance Deed (Article 25). |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

JYOTSNA M. MADEKAR,
Desk Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.